अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,
आस्थापना विभाग, पुणे मनपा.
जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/१९८२
दिनांक : २८/०६/२०२०

-: आदेश :-

विषय :- **<u>कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.</u>**
कोरोना विषाणू आजाराच्या (कोवीड-१९) अनुषंगाने शिक्षण विभाग (प्राथमिक) कडील उपशिक्षकांना परिमंडळ निहाय उपलब्ध करून देणेबाबत.

संदर्भ :- १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५

पुणे महानगरपालिका हद्दीत सध्या कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत आहे, त्याचा प्रसार होऊ नये यासाठी पुणे महानगरपालिका वेगवेगळया स्तरावर कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जात आहेत.

त्यानुसार शिक्षण विभाग (प्राथमिक) कडील उपशिक्षकांना सोबत जोडलेल्या यादीनुसार परिमंडळ क्र.१ ते ५ निहाय (डाटा एन्ट्रीचे व इतर तदनुषंगिक कामकाजाकरिता) उपलब्ध करून देण्यात येत आहे. संबंधित कर्मचारी यांनी उप आयुक्त, परिमंडळ यांचे नियंत्रणाखाली त्यांचे आदेशानुसार कामकाज करावयाचे आहे.

सदर कर्मचारी नेमून दिलेल्या ठिकाणी हजर न झाल्यास व सदरच्या कालावधीत या कामास नकार देणा-या, हलगर्जीपणा करणा-या व्यक्तींविरुद्ध संदर्भीय कायद्यान्वये कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

उप आयुक्त, परिमंडळ यांनी त्यांचे अधिनस्त कोरोना विषाणू आजाराच्या कामकाजाबाबत सदर कर्मचाऱ्यांचे आदेश आपले स्तरावरून प्रसृत करावेत.

वरील कर्मचाऱ्यांची नियुक्ती या कार्यालयीन आदेशाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत करण्यात येत आहे. तसेच सदरचे सेवकांचे रुजू अहवाल परिमंडळ कार्यालयाने उप आयुक्त (सामान्य प्रशासन) यांचेकडे सादर करावेत.

Rubal
२८/६/२०२०

**(रुबल अग्रवाल)**
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
**पुणे महानगरपालिका**

**प्रत –**
१) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका
२) मा. अतिरिक्त आयुक्त (वि) यांना माहितीस्तव.